# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६७८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/१०/२०१६

**१) घरातील सोन्या–चांदीची व नगदी पैश्याची चोरी. :–**

दिनांक १५/१०/२०१६ रोजी ०२.०० ते ०५.०० वा. दर. यातील फिर्यादी व ईतर ३ इसमांचे घराचे खुल्या दारातुन आत प्रवेश करून सोन्याच्या ताईत ०.५ ग्रॅम, सोन्याची अंगठी ०.५ ग्रॅम, चांदीचे पायल ८२ ग्रॅम, १ मॅक्स कंपनीचा मोबाईल व नगदी ४००/–रू. तसेच गावातील नत्थु केवट यांचे खिश्यातील नगदी ८५०/–रू. व जर्मन डब्यात ठेवलेले ५००/–रू. तसेच रमेश बारस्कर यांचे खिश्यातील २५०/–रू. तसेच विष्णु चव्हान यांचे घरी ठेवलेला मायक्रोमॅक्स कंपनीचा सिम कार्ड असलेला मोबाईल असा एकुण १३,५४०/–रू. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी जिवतु हरी नागपुरे वय ४५ वर्ष रा. सुरेवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२)घरासमोरील पोर्च मधुन मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक १४/१०/२०१६ रोजी २३.३० वा. ते १५/१०/२०१६ चे ०७.०० वा. दर. यातील फिर्यादीने आपली काळया रंगाची हिरो होंडा प्लस मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे ७९१३ कि. १०,०००/–रू. ची घरासमोर पोर्च मध्ये ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरून नेल्याने फिर्यादी मनोहर लहानुजी जौंजाळ वय ४९ वर्ष रा. खरबी नाका यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जनबंधु पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) गैर कायदयाची मंडळी जमवुन शिविगाळ करून गाडयांची तोडफोड केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/१०/२०१६ रोजी २२.३० ते २३.१५ वा. दर. यातील आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन शिविगाळ करून फिर्यादी व त्याचे मीत्राच्या गाडयांची तोडफोड करून फिर्यादीचे बुलेट मोटार सायकल वर रॉलेल टाकुन जाळण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी गोपाल धनबहादुर ठाकुर वय ३२ वर्ष रा. इंदीरा गांधी वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १४३,१४७,१४९,४२७,४३५,५११,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) महीलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १४/१०/२०१६ रोजी २३.०० वा. दर. यातील फिर्यादीचे घरासमोर मोहरम तिजा कार्यक्रम सुरू असतांना तेथे यातील आरोपी हा काही लोकांसह धावत आला असता त्यास फिर्यादीचे पतीने तुम्ही का धावत आहात असे हटकले असता आरोपीने हुज्जत करून फिर्यादी ही मध्यस्ती आली असता आरोपीने तिचे हात पकडुन ओडतान करून तिचे लज्जेस धोका पोहचवुन विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. रायपुरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.